दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. २९ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ९९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## नागपुरात मुसळधार पावसाची जोरदार हजेरी : 'यलो अलर्ट'

**नागपूर :** उपराजधानी नागपूरमध्ये हवामान खात्याच्या अंदाजानुसार मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला आहे. सकाळपासून सुरू झालेल्या या मुसळधार पावसामुळे नागपूरकरांची मोठी तारांबळ उडाली आहे. शहरात सकाळी ढगाळ वातावरणासह पावसाच्या हलक्या सरी कोसळत होत्या, मात्र दुपारच्या सुमारास पावसाने अचानक जोर धरला. यामुळे शहरातील अनेक प्रमुख रस्ते आणि सखल भागात पाण्याचे साम्राज्य निर्माण झाले असून काही ठिकाणी तर रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## PUC सर्टिफिकेटची वैधता 3 वर्षांपर्यंत वाढवण्याचा सरकारचा प्रस्ताव

**नवी दिल्ली :** वाहनांमुळे होणारे हवेचे प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी दरवर्षी प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (PUC) घेण्याचे बंधन आतापर्यंत वाहनांवर होते. पण आता या नियमात बदल करण्याबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय विचार करत आहे. यामुळे प्रदूषण कसे नियंत्रणात राहणार हा प्रश्न अनुत्तरीत आहे. पण दरवर्षी PUC करणाऱ्या वाहनधारकांना दिलासा मिळणार आहे.नव्या BS-6 वाहनांसाठी PUC प्रमाणपत्राची वैधता सध्याच्या एका वर्षाऐवजी तब्बल तीन वर्षे करण्याचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयात विचाराधीन आहे.

## चार लाखांच्या लाचेची मागणी; श्रीरामपूरच्या पोलीस उपनिरीक्षकासह तिघांवर गुन्हा

**अहिल्यानगर :** गुन्ह्यात आरोपी न करणे व अटक टाळून देण्याच्या मोबदल्यात चार लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी सध्या श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक हर्षवर्धन दिलीप बहीर यांच्यासह दोन खासगी व्यक्तींविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. येवला तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असताना हा प्रकार घडल्याचा आरोप असून, लाचेपोटी 'फोन-पे'द्वारे ५० हजार रुपये स्वीकारल्याचा आरोपही चौकशीत समोर आला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या भावाला येवला तालुका पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात आरोपी न करणे आणि त्याला अटक न करण्यासाठी सुरुवातीला चार लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर तडजोडीअंती ही रक्कम अडीच लाख रुपयांवर निश्चित करण्यात आली.

या प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक बहीर यांच्या सांगण्यावरून त्यांच्यावतीने सुनील शिवाजी बोराडे (रा. पाटोदा, ता. येवला) याने ९ एप्रिल २०२६ रोजी तक्रारदाराकडून 'फोन-पे'द्वारे लाचेच्या रकमेपैकी ५० हजार रुपये स्वीकारल्याचा आरोप आहे. उर्वरित रक्कम स्वीकारण्याची तयारीही त्याने दर्शविल्याचे एसीबीच्या चौकशीत निष्पन्न झाले आहे.

तसेच जगदीश तुकाराम बोराडे (रा. पाटोदा, ता. येवला) याने तक्रारदाराला लाचेची रक्कम देण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या तिघांविरुद्ध येवला तालुका पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ मधील कलम ७-अ आणि १२ अन्वये गुन्हा क्रमांक ४१०/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाची पडताळणी तत्कालीन पोलीस निरीक्षक पुनम केदार यांनी केली. पोलीस निरीक्षक योगेश भास्कर शिंदे यांनी गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुलकुमार नाईक करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक भारत तांगडे तसेच अपर पोलीस अधीक्षक प्रदीप मैराळे आणि कविता फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत,

## थोडक्यात वार्ता

### अभिनेते देव आनंद यांच्या मुलाचे निधन



**लंडन :** हिंदी चित्रपटसृष्टीचे सदाबहार अभिनेते दिवंगत देव आनंद यांच्या कुटुंबावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. देव आनंद यांचे सुपुत्र सुनील आनंद यांचे अचानक निधन झाले आहे. प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना सोमवारी सकाळी लंडनमधील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यांची प्राणज्योत मालवली. नियतीचा अजब खेळ म्हणजे, २०११ मध्ये ज्या लंडनमधील रुग्णालयात देव आनंद यांनी अखेरचा श्वास घेतला होता, नेमक्या त्याच रुग्णालयात सुनील आनंद यांनीही जगाचा निरोप घेतला. या बातमीमुळे संपूर्ण बॉलिवूड आणि चाहत्यांमध्ये तीव्र शोक व्यक्त केला जात आहे.

### पीओजेकेतील निवडणुका दिखावा, मानवी हक्क उल्लंघन लपवण्याचा प्रयत्न- रणधीर जयस्वाल

**नवी दिल्ली:** पाकिस्तानच्या ताब्यातील जम्मू-काश्मीर (पीओजेके) येथे घेतल्या जात असलेल्या तथाकथित विधानसभा निवडणुकांवर भारताने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, भारताने या निवडणुकांबाबतच्या बातम्या पाहिल्या आहेत आणि ही संपूर्ण प्रक्रिया पाकिस्तानच्या बेकायदेशीर ताब्याला वैधतेचे स्वरूप देण्याचा प्रयत्न आहे. रणधीर जयस्वाल म्हणाले, "पाकिस्तानच्या ताब्यातील जम्मू-काश्मीरमध्ये घेतल्या जात असलेल्या तथाकथित विधानसभा निवडणुकांबाबतच्या बातम्या आम्ही पाहिल्या आहेत. जम्मू, काश्मीर आणि लडाखचा संपूर्ण केंद्रशासित प्रदेश, त्यात सध्या पाकिस्तानच्या बेकायदेशीर आणि बळजबरीच्या ताब्यात असलेले भागही समाविष्ट आहेत, हा भारताचा अविभाज्य भाग आहे.

### शिक्षण क्षेत्रात खळबळ उडवून देणारा 'गरुड' जाळ्यात असा अडकला

**मुंबई :** राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या बहुचर्चित 'शालार्थ आयडी' घोटाळ्यात आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धडक कारवाई करण्यात आली आहे. या घोटाळ्यातील मुख्य आरोपी असलेला शिक्षण संस्थाचालक संजय गरुड याला सोलापूर जिल्ह्यातील नातेपुते येथील एका फार्महाऊसमधून नाशिक गुन्हे शाखेने सोमवारी रात्री ताब्यात घेतले आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून पोलीस गरुड याच्या मागावर होते. अखेर दोन दिवसांच्या शोधमोहीमेनंतर नाशिकच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. प्राथमिक माहितीनुसार, संजय गरुड यांच्याशी संबंधित शेंदुर्णी एज्युकेशन संस्थेतील १७७ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शालार्थ आयडी अवघ्या एका दिवसात तयार करण्यात आल्याचा आरोप आहे. शालार्थ प्रणालीमध्ये इतक्या मोठ्या संख्येने आयडी एका दिवसात तयार होणे संशयास्पद मानले जात असून, याच मुद्द्यावरून तपास यंत्रणेने सखोल चौकशी सुरू केली आहे. या आयडींच्या आधारे शासनाकडून वेतन अथवा इतर आर्थिक लाभ उचलण्यात आले का, निधी कोणाच्या खात्यात गेला, संबंधित कागदपत्रे आणि मंजुरीची प्रक्रिया कशी पार पडली,

## त्र्यंबकेश्वरमध्ये दरड कोसळण्याच्या धोक्याचा जीएसआयकडून अभ्यास; पाच भूकंप निरीक्षण केंद्रे उभारणार

**नाशिक :** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरातील दरड कोसळण्याचा धोका असलेल्या ठिकाणांचे भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग (जीएसआय) ऑगस्टच्या पूर्वार्धात सर्वेक्षण करणार आहे. यासोबतच त्र्यंबकेश्वर परिसरात भूगर्भीय हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पाच भूकंप निरीक्षण केंद्रे उभारण्यात येणार आहेत.



कुंभमेळ्यासाठी मोठी तयारी

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने संभाव्य आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी तयारी सुरू केली असून, १० नैसर्गिक आणि सात मानवनिर्मित अशा एकूण १७ संभाव्य आपत्तींचा अभ्यास केला जात आहे. पावसाळ्यात होणारा नाशिकचा कुंभमेळा हा देशातील इतर कुंभमेळ्यांपेक्षा वेगळा असल्याने अतिवृष्टी, पूर, दरड कोसळणे आणि भूकंप यांसारख्या संकटांचा विशेष विचार करून नियोजन केले जात आहे. यावर्षी झालेल्या मुसळधार पावसात त्र्यंबकेश्वरसह परिसरात मोठे नुकसान झाले होते. अनेक पूल पाण्याखाली गेले, काही ठिकाणी दरडी कोसळल्या आणि वाहतूक विस्कळीत झाली. गोदावरी नदीला आलेल्या पुरामुळे नदीकाठावरील नागरिकांचे स्थलांतर करावे लागले होते. त्याच काळात सुरगाणा, पेठ (Peth) आणि दिंडोरी तालुक्यांमध्ये सलग तीन दिवस सौम्य भूकंपाचे धक्केही जाणवले होते.

पाच भूकंप निरीक्षण केंद्रे उभारली जाणार

या पार्श्वभूमीवर जीएसआयचे पथक नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरातील अतिधोकादायक ठिकाणांची नव्याने पाहणी करणार आहे. या अभ्यासासाठी कुंभमेळा प्राधिकरणाकडून जीपीएस लोकेशन आणि छायाचित्रांसह अद्ययावत माहिती जीएसआयला (GSI) उपलब्ध करून दिली जाणार आहे. या अभ्यासाच्या आधारे भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजनांची शिफारस करण्यात येणार असल्याची माहिती कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

दरम्यान, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील भूगर्भीय हालचालींचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी पाच भूकंप निरीक्षण केंद्रे उभारली जाणार आहेत. या केंद्रांमधून मिळणाऱ्या वैज्ञानिक माहितीच्या आधारे कुंभमेळ्यापूर्वी सुरक्षित पायाभूत सुविधांचे नियोजन आणि दीर्घकालीन आपत्ती निवारण आराखडा अधिक प्रभावीपणे तयार करता येणार असल्याचेही आयुक्त सिंह यांनी सांगितले. या संदर्भातील बैठकीला जीएसआय राज्य युनिटचे उपमहासंचालक डॉ. बिभास सेन, संचालक मेगो चासी, प्रादेशिक कार्यालयाचे संचालक साबीर पठाण, शास्त्रज्ञ अक्षय जोशी तसेच कुंभमेळा प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे उपस्थित होते.

### 'टॅक्स ब्लॉक'ची भीती दाखवून लाटायचे होते लाखभर रुपये

## एसीबीच्या सापळ्यात अडकले महिला अधिकारी आणि खासगी सल्लागार!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजी नगर/जालना :** सरकारी खात्यात बसून गरीबांच्या आणि व्यापाऱ्यांच्या कष्टाच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची मस्ती जिरवण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एकदम फिल्मी स्टाईलने सापळा रचत एका महिला राज्यकर सहायक आयुक्तांना आणि त्यांच्या खासगी दलालाला बेड्या ठोकल्या आहेत. इन्पुट टॅक्स क्रेडिट (ITC) अनब्लॉक करण्याच्या मोबदल्यात अक्षरशः खाबुगिरी करत लाचेची मागणी करणाऱ्या या जोडीला एसीबीच्या पथकाने रंगेहाथ जेरबंद केले आहे. सुवर्णा रामेश्वर लोहीया (वय ४४, राज्यकर अधिकारी तथा वर्ग-२ सहायक आयुक्त, जालना-२) आणि त्यांचाच खासगी कर सल्लागार म्हणून काम करणारा अक्षय प्रेमचंद जैन (लोढा, वय २८, रा. छत्रपती संभाजीनगर/जालना) अशी या खाबुगिरी करणाऱ्या मुख्य आरोपींची नावे आहेत. या कारवाईने जालना जिल्ह्यात शासकीय कार्यालयांमध्ये सुरू असलेल्या 'अर्थकारण' आणि लाचखोरीच्या गुप्त खेळाचा पर्दाफाश झाला आहे."तुम्ही दोनो को मिलवाया अपना आकडा डिसाईड करो, जल्दी से और फ्री का दो..." असा सल्ला देत टॅक्स सल्लागाराने उघडपणे लाचेची सुपारी घेतली होती, आणि प्रत्यक्ष कार्यालयात नोटांचा खेळ रंगला!

प्रकरणाची सुरुवात तशी साधीच होती; तक्रारदाराचे जालन्यात इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे दुकान. पण ६ जून रोजी अचानक राज्यकर कार्यालय जालना येथून एक नोटीस आली आणि तक्रारदाराच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांचे इन्पुट टॅक्स क्रेडिट ब्लॉक करण्यात आले होते. हा ब्लॉक काढण्यासाठी आणि कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी जेव्हा तक्रारदार कर सल्लागार अक्षय लोढा यांच्याकडे गेले, तेव्हा खरा खेळ सुरू झाला.

अक्षय लोढा यांनी थेट राज्यकर अधिकारी सुवर्णा लोहीया यांची भेट घडवून आणली आणि आयटीसी अनब्लॉक करण्यासाठी तब्बल १ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. "साहेब लोकांसाठी मलिदा द्यावाच लागतो," असा संदेश देत या भामट्याने तक्रारदाराला पिळून काढण्याचा घाट घातला.

## भुसा भरलेल्या गादीपासून ते राष्ट्रकुल स्पर्धेतील रौप्यपदकापर्यंत !

### नाशिकच्या सर्वेश कुशारेची प्रेरणादायी झेप

**नाशिक :** नाशिकच्या निफाड तालुक्यातील देवगाव या छोट्याशा गावातून सुरू झालेला सर्वेश कुशारेचा प्रवास आज जगभर गाजत आहे. भुसा भरलेल्या गादीवर उंच उडीचा सराव करणाऱ्या सर्वेश कुशारेने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताला ऐतिहासिक रौप्यपदक मिळवून देत नवा इतिहास रचला आहे. ग्लासगो (Glasgow) येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत सर्वेशने तब्बल २.२५ मीटर उंच झेप घेत भारताच्या खात्यात उंच उडीतील पहिलेच रौप्यपदक जमा केले. त्यामुळे सर्वेशचे नाव भारतीय ॲथलेटिक्सच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.

संधीचं केलं सोनं : सर्वेशच्या या यशामागे त्याची जिद्द आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी कारणीभूत आहे. नाशिकच्या निफाड (Niphad) तालुक्यातील देवगाव येथील श्री. डी. आर. भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा सर्वेश हा माजी विद्यार्थी. सर्वेशचे वडील अनिल कुशारे हे शेतकरी. आपल्या मुलाने सिव्हिल इंजिनियर व्हावे, अशी त्यांची इच्छा. परंतु, सर्वेशला मात्र उंच उडी या क्रीडा प्रकाराने आकर्षित केले होते. नाशिक विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेत उंच उडीत सर्वेशने तृतीय क्रमांक मिळवल्यावर क्रीडा प्रशिक्षक रावसाहेब जाधव हे त्याच्या कामगिरीने प्रभावित झाले. त्यांनी २०१० पासून सर्वेशकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली.

गावात आवश्यक सुविधा नसल्याने मक्याचा भुसा, जुने कपडे आणि कापूस वापरून त्यांनी गावठी गादी तयार केली आणि त्याच गादीवर सर्वेशच्या यशाची पायाभरणी झाली. २०१६ मध्ये भारतीय सैन्यात दाखल झाल्यानंतर पुण्यातील आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटमध्ये त्याने आधुनिक प्रशिक्षण घेतले. त्यानंतर दक्षिण आशियाई स्पर्धेतील सुवर्णपदक, आशियाई ॲथलेटिक्समधील रौप्यपदक, जागतिक स्पर्धेतील सहभाग, पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता अशा अनेक टप्प्यांवर सर्वेशने सातत्याने भारताचा झेंडा उंचावला.

मागील वर्षी टोकियो येथे झालेल्या जागतिक स्पर्धेत २.२८ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करत अंतिम फेरीत सहावे स्थान मिळवणारा तो पहिला भारतीय ठरला. यंदा भुवनेश्वर येथे राष्ट्रीय आंतरराज्य स्पर्धेत २.३१ मीटर उंच उडी मारत त्याने तेजस्वीन शंकरचा राष्ट्रीय विक्रमही मोडला आणि भारताचा अव्वल उंचउडीपटू म्हणून स्वतःची ओळख अधिक भक्कम केली. इतकेच नाही, तर मोनॅको डायमंड लीगमध्ये कांस्यपदक जिंकत या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत पदक मिळवणारा पहिला भारतीय उंचउडीपटू आणि एकूण चौथा भारतीय खेळाडू ठरण्याचा मानही सर्वेशने पटकावला.

## नवीन पाणीपुरवठा योजनेला गती; विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्याकडून कामाचा सविस्तर आढावा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहराला सुरळीत आणि नियमित पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या उर्वरित मुख्य कामांना वेग देण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले आहेत.




आज विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात छत्रपती संभाजीनगर शहराच्या नवीन पाणीपुरवठा योजनेच्या सद्यस्थितीबाबत एका उच्चस्तरीय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये त्यांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला. या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांच्यासह कंत्राटदार कंपनीचे प्रतिनिधी आणि विविध संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला सर्व संबंधित विभाग आणि कंत्राटदार कंपनीच्या वतीने प्रकल्पाच्या सद्यस्थितीबद्दल सविस्तर माहिती सादर करण्यात आली. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी जलवाहिन्या जोडण्याची कामे, जॅकवेलची कामे, पंपिंग स्टेशन, पाणी शुद्धीकरण प्रकल्प तसेच बटरफ्लाय व्हॉल्वची दुरुस्ती व तपासणी यांसारख्या विविध तांत्रिक बाबींचा सखोल आढावा घेतला. जलकुंभांपर्यंत पाणी सुरळीत पोहोचण्याच्या मार्गात जर कुठल्याही जलवाहिनीमध्ये लिकेज किंवा अडथळा असेल, तर त्याची तातडीने दुरुस्ती करून योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे सक्त निर्देश त्यांनी यावेळी दिले. या योजनेंतर्गत होणारी सर्व कामे अत्यंत उच्च दर्जाची आणि गुणवत्तापूर्ण असावीत, यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. शहरातील प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी पोहोचवण्याच्या नियोजनाबाबत मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, घरोघरी पाणी पोहोचवण्यासाठी शहरातील नियमित मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांना कायदेशीर नळ जोडण्या उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यासाठी नागरिकांकडून अर्ज भरून घेण्यात येणार असून, अर्धा इंच नळ जोडणीसाठी किमान सहा हजार रुपये इतके शुल्क आकारण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## "शाल जोडे"




## सावंगी बायपास–पळशी रस्त्यावर चिखल, खडी अन् वाहतूक कोंडी; रखडलेल्या कामामुळे नागरिकांचा संताप

### सिमेंट रस्त्याचे काम संथ गतीने; शालेय विद्यार्थी, दूध व्यावसायिक, नोकरदारांची रोजची फरफट

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर शहराला जोडणाऱ्या सावंगी बायपास ते पळशी या महत्त्वाच्या मार्गावरील सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांचा संयम संपत चालला आहे. एका बाजूला रस्त्याचे काम सुरू असताना दुसरी बाजू चिखल, खडी आणि खड्ड्यांनी व्यापली असून पावसामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. परिणामी या मार्गावर दररोज वाहतूक कोंडी होत असून हजारो नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.



या मार्गावरून पळशी, सावंगी तसेच परिसरातील गावांतील नागरिक मोठ्या संख्येने दररोज छत्रपती संभाजीनगरकडे ये-जा करतात. मात्र, रस्त्याचे काम रखडल्याने वाहतूक एकाच बाजूने सुरू आहे. त्याचवेळी सिमेंट रस्त्याच्या कामासाठी टिप्पर, ट्रक आणि इतर जड वाहनांची सततची ये-जा सुरू असल्याने वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. सकाळी आणि सायंकाळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून नागरिकांचा अमूल्य वेळ वाया जात आहे.

पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल आणि खडी पसरली आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांना घसरून अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. शालेय विद्यार्थ्यांना वेळेत शाळेत पोहोचणे कठीण झाले असून पालकांना त्यांना लवकर घराबाहेर काढावे लागत आहे. दूध व्यावसायिक, रुग्णवाहिका, नोकरदार आणि व्यापाऱ्यांनाही वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याच्या कामाचा वेग अत्यंत मंद असून नियोजनाचाही अभाव दिसून येत आहे. एका बाजूचे काम पूर्ण करून तो रस्ता तातडीने वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा, तसेच वाहतूक सुरळीत राहण्यासाठी स्वतंत्र वाहतूक व्यवस्थापन करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. काम सुरू असलेल्या ठिकाणी पुरेसे इशारा फलक, वाहतूक नियंत्रक कर्मचारी आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना नसल्याबद्दलही नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

सावंगी बायपास–पळशी हा शहराशी जोडणारा प्रमुख मार्ग असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या कामाला गती देऊन ते युद्धपातळीवर पूर्ण करावे, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# संपादकीय

## परीक्षांची पारदर्शकता, तरुणांचे भविष्य आणि राजकीय कलगीतुरा

लोकसभेत 'अँटी पेपर लीक विधेयका'वरील (Anti-Paper Leak Bill) चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये उडालेला जोरदार राजकीय धुरळा हा केवळ एका कायद्यावरील वादविवाद नाही, तर तो देशातील करोडो तरुणांच्या भविष्याशी जोडलेला अत्यंत संवेदनशील विषय आहे. नॅशनल एलिजिबिलिटी कम एन्ट्रन्स टेस्ट अर्थात 'नीट' (NEET) आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील घोटाळ्यांनंतर देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाची व निराशेची लाट पसरली होती. या पार्श्वभूमीवर, परीक्षा व्यवस्थेला कडक कायद्याचे कवच देण्याच्या उद्देशाने आणलेले हे विधेयक अत्यंत स्वागतार्ह आहे. मात्र, संसदेत ज्या प्रकारे या महत्त्वाच्या मुद्द्यावर राजकीय आरोपांची चिखलफेक झाली, ती पाहता तरुणांच्या प्रश्नांकडे राजकीय चष्म्यातून न पाहता अधिक गंभीरतेने पाहण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. केंद्र सरकार आणि भाजप खासदारांच्या दाव्यानुसार, हे विधेयक परीक्षा माफियांवर कठोर कारवाई करण्यासाठी आणि परीक्षा प्रणाली पूर्णपणे पारदर्शक व सुरक्षित करण्यासाठी मैलाचा दगड ठरेल. परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांची गांभीर्याने दखल घेऊन तज्ज्ञांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेली 'टास्क फोर्स' आणि तातडीने फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय ही सरकारच्या सकारात्मक तत्परतेची चिन्हे आहेत. परंतु, दुसऱ्या बाजूला काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि इतर विरोधी पक्षांनी उपस्थित केलेले प्रश्न पूर्णपणे डावलता येण्यासारखे नाहीत. २०१४ पासून अनेक राज्ये आणि केंद्र स्तरावर एकापाठोपाठ एक समोर आलेले पेपर लीकचे प्रकार, शिक्षण व्यवस्थेतील केंद्रीकरण आणि परीक्षांच्या आयोजनातील त्रुटींमुळे तरुण पिढीचा व्यवस्थेवरील विश्वास ढासळला आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. या संपूर्ण वादात सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे आंदोलक विद्यार्थ्यांवरील कारवाई आणि त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न. डिंपल यादव आणि सुप्रिया सुळे यांच्यासारख्या महिला नेत्यांनी अत्यंत योग्यरीत्या अधोरेखित केले की, राजकीय मतभेद आणि पक्षाचे ध्येयधोरण बाजूला ठेवून देशाच्या भवितव्याशी निगडित असणाऱ्या या गंभीर प्रश्नावर सर्व पक्षांनी एकाच व्यासपीठावर येऊन काम करणे गरजेचे आहे. शांततापूर्ण मार्गाने न्याय मागणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज किंवा अश्रूधुराचा वापर होणे लोकशाहीला शोभणारे नाही. विद्यार्थ्यांनी न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागणे हेच मुळात प्रशासकीय यंत्रणेचे मोठे अपयश दर्शवते. केवळ कडक कायदे करून किंवा कठोर शिक्षेची तरतूद करून पेपर लीकच्या घटना पूर्णपणे थांबतील असे नाही, तर त्यासाठी संपूर्ण परीक्षा यंत्रणेचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे शुद्धीकरण करणे आवश्यक आहे. भाजपने म्हटल्याप्रमाणे निष्पक्ष परीक्षा व्यवस्था हीच सामान्य व मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी प्रगतीचे सर्वात मोठे साधन असते. म्हणूनच, संसद भवनातील परस्परविरोधी आरोपांपेक्षा प्रत्यक्ष अंमलबजावणीतील कठोरता आणि परीक्षा घेणाऱ्या संस्थांची (उदा. NTA) उत्तरदायित्व क्षमता वाढवणे अधिक महत्त्वाचे आहे. तरुणांना केवळ आश्वासने किंवा राजकीय आरोप-प्रत्यारोप नको आहेत, तर त्यांना त्यांच्या कष्टाचे चीज करणारी एक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा प्रणाली हवी आहे.

## चांगले मार्गदर्शन,प्रेरणा व संस्कार देणारा प्रत्येक व्यक्ती आपला "गुरू"

प्राचीन काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील "पौर्णिमा"साजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसुन येते.गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान-सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे. कारण "गुरू शिवाय ज्ञान नाही"ही म्हण सत्य आहे.गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून चांगले विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासुन आपल्याला चांगल्याप्रकारची चालना,गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम,आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती चांगले आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे."आई-वडिल" हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत.जो पर्यंत सुर्य-चंद्र- आकाश-पाताळ आहे तोपर्यंत आई-वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे आणि राहील यात दुमत नाही. कारण आई- वडीलां समोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे. ज्याप्रमाणे संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते.आई मायेचे पांघरूण घालुन मुला-मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो. त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घडली तर आपण "आईग" म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात.यामुळे आपले दुःख कमी होते.त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण "बापरे" म्हणतो.यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो. अशाप्रकारे आई-वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे हे जगात दिसून येते. म्हणजेच या जगात जो आपले पालन-पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो. त्याचप्रमाणे आपण नेहमी पहातो की आई- वडीलांचा अपमान कोनीही सहन करीत नाही आणि करणार नाही.अशा परिस्थितीत मुलं-मुली तुटून पडतात.यात खरे गुरु-शिष्याचे नाते दिसून येते.म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू-शिष्याचे नाते म्हणजे आई-वडिलच!यात मोठा वाटा म्हणजे आई-वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन.यातुनच गुरू-शिष्याचा जन्म झाला.आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या अफाट सावलीत मुलांची जोपासना करते तर वडील याच वटवृक्षाचा पहारेकरी बनुन परिवाराचे जतन व संरक्षण करते व पहाडासारखा उभा रहातो.मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा-चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख-दुःखाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते.कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो.आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो. तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासुन मिळत असते.आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो.कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात.त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची अत्यंत आवश्यकता असते.कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते.त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पहातो की कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू- शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकल्या जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडुलकर, दारासिंग,खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद,निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा. गुरूच्या परीक्षेत जो-जो पास होतो. तीच शिष्यांकडून गुरू दक्षिणा असते. आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू-शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच. व्दापरयुग,सत्ययुग,कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते. याकरीता गुरूची आवश्यकता असने गरजेचे असते.राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू-शिष्याचे नाते दिसून येते.यातुन राजकीय पुढारी तयार होतात. आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला.त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवु शकतो. कारण क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले.त्यामुळे गुरू शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही. याकरीता कोणतेही क्षेत्र असो अनुभव,ज्ञान,माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते. म्हणुनच म्हटल्या जाते "गुरू बिना ज्ञाण अधुरा". त्याचप्रमाणे आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी.आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी-देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो.कारण आपण केलेल्या कार्याला यश प्राप्त झाले पाहिजे.भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत,थोरमहात्मे, होवुन गेले.याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो. त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विश्र्व गुरू म्हणुन संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे भारताला विश्र्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते. कारण जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे.म्हणजेच आज भारत विश्र्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते. ह्या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धर्माची जोपासना यामुळेच भारताला विश्र्व गुरू म्हणून संबोधल्या जाते.गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई-वडीलांच्या सेवेला,त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू-शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे. आताही भारतात गुरू शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती-पंथ यांचा एकत्रितपणा यामुळेच आपल्याला गुरु-शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.शिष्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्यांच्या पासून आपण प्रेरणा घेतो,त्याची अवहेलना कुठेही होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.यातच शिष्यांची महानता दिसून येईल.गुरू पौर्णिमेबद्दल एक गोष्ट सांगु इच्छितो की,परीवारापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही, वडिलांपेक्षा श्रेष्ठ सल्लागार नाही,आई पेक्षा श्रेष्ठ जग नाही,भावापेक्षा श्रेष्ठ भागीदार नाही,बहीनी पेक्षा श्रेष्ठ शुभचिंतक नाही,मित्राशिवाय आयुष्य नाही यात आपल्याला गुरूचा गोडवा कीती महान आहे ते आपल्याला स्पष्ट दिसून येते.म्हणजेच प्रत्येक परीवार गुरूची भुमिका आप-आपल्या परीने पार पाडत असते.त्याचप्रमाणे सर्वांनीच एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की गुरू-शिष्याच्या नात्याला कोणीही कलंकित करणार नाही याचीही काळजी सर्वांनीच घेणे गरजेचे आहे. कारण गुरू-शिष्याच्या नात्यानेच आपण घडतो आणि घडवितो, आपला परिवार घडते व यातुनच देश घडतो."आई माझा गुरु,आई कल्पतरू, सुखाचा सागरू,आई माझी प्रीतीचे माहेर, शांतीचे आगार, मांगल्याचे सार आई माझी". गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने मी सर्वांना विनंती करतो की बदलते हवामान व देशातील वाढते प्रदुषण,ऑक्सिजनचे कमी होत असलेले प्रमाण आणि ग्लोबल वॉर्मिगमुळे वाढणारा धोका रोखण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या परिसरात किंवा घरी वृक्षारोपण केले पाहिजे.ज्याच्या परिसरात जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावुन वृक्षारोपण करायला हवे.कारण वाढते प्रदुषण मानव, जिवजंतू, वन्यप्राणी यांच्यासाठी अत्यंत धोकादायक स्थितीत आहे.त्यामुळे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे व पृथ्वी मातेचे रक्षण केले पाहिजे.गुरूपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

## खरीप पीक स्पर्धेसाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी** : राज्यातील अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांची उत्पादकता वाढविणे, प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करणे या उद्देशाने खरीप हंगाम २०२६-२७ अंतर्गत राज्यांतर्गत पीकस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

यापूर्वी पीकस्पर्धेची प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने राबविण्यात येत होती. मात्र, प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता व गतिमानता आणण्यासाठी खरीप हंगाम २०२६ पासून स्पर्धेसाठी स्वतंत्र ऑनलाईन संगणक प्रणाली सुरू करण्यात आली आहे.

या स्पर्धेत भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल या एकूण ११ पिकांचा समावेश असून तालुका, जिल्हा व राज्य या तीन स्तरांवर स्पर्धा होणार आहे. सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील उत्पादकतेच्या आधारे विजेत्यांची पुढील स्तरासाठी निवड केली जाईल.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावरील जमीन असणे व ती स्वतः कसत असणे आवश्यक आहे. एका शेतकऱ्याला एकापेक्षा अधिक पिकांसाठी स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. भात पिकासाठी किमान २० गुंठे, तर इतर पिकांसाठी किमान ४० गुंठे सलग लागवड असणे आवश्यक आहे.

अर्जासाठी शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी), प्रवेश शुल्क भरल्याची पावती, आदिवासी गटासाठी जात प्रमाणपत्र, आणि बँक पासबुक किंवा धनादेशाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत आवश्यक आहे. मूग व उडीद पिकांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६, तर भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२६ आहे.

स्पर्धेचे प्रवेश शुल्क सर्वसाधारण गटासाठी रु. ३०० आणि आदिवासी गटासाठी रु. १५० आहे. तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी रु. ५० हजार, द्वितीयसाठी रु. ४० हजार आणि तृतीयसाठी रु. ३० हजार इतके बक्षीस देण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकासाठी रु. 10 हजार, द्वितीयसाठी रु. 07 हजार आणि तृतीयसाठी रु. 05 हजार इतके बक्षीस देण्यात येणार आहे. आणि तालुकास्तरावर प्रथम क्रमांकासाठी रु. 05 हजार, द्वितीयसाठी रु. 03 हजार आणि तृतीयसाठी रु. 02 हजार इतके बक्षीस देण्यात येणार आहे.

जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या संकेतस्थळावरील **http://**Krishi.maharashtra.gov.in 'पीक स्पर्धा नोंदणी' या पर्यायाद्वारे ऑनलाईन अर्ज करून या स्पर्धेत सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026

## कर्जमुक्ती लाभार्थींची पहिली यादी जाहीर, आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

परभणी– "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026” अंतर्गत पहिली लाभार्थी यादी जाहीर झाली असून 79 हजार 855 शेतकऱ्यांना एकूण रक्कम 582 कोटी रूपयांचा कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.

लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी यादीतील त्यांचा विशिष्ट क्रमांक, आधार कार्ड तसेच बँकेचे पासबुक घेवून नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रात किंवा बँक शाखेत जावून तात्काळ आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे. असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, विभागीय सहनिबंधक (सहकारी संस्था) संतोष बिडवई, जिल्हा उपनिबंधक विकास जगदाळे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026" दि. 2 जून 2026 रोजी जाहीर केलेली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना मुद्दल व व्याजासह प्रति शेतकरी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती देण्यात येणार आहे.

1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2025 या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा समावेश करण्यात आला असून 30 सप्टेंबर 2025 पर्यंत थकीत व 31 मार्च 2026 पर्यंत न फेडलेल्या कर्जांना ही योजना लागू आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर त्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. यासाठी 31 मार्च 2027 पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या तरतुदीमुळे मोठ्या थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळणार आहे.

कर्जफेडीची शिस्त टिकवून ठेवण्यासाठी शासनाने विशेष प्रोत्साहनपर लाभाची तरतूद केली आहे. नियमानुसार कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन दिले जाणार आहे. यामुळे प्रामाणिक कर्जदारांना प्रोत्साहन मिळून बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होणार आहे.

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026" अंतर्गतची थकबाकीदार पात्र शेतकऱ्यांची यादी दि. 24 जुलै 2026 रोजी प्रसिद्ध झालेली आहे. परभणी जिल्हयात एकूण 1 लाख 60 हजार 769 शेतकरी सभासदांपैकी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. परभणी 2 हजार 985 व राष्ट्रीयकृत बँकेचे 1 लाख 57 हजार 784 शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड केलेली आहे. पहिल्या यादीतील 79 हजार 855 शेतकऱ्यांना एकूण रक्कम 582 कोटी रूपयांचा लाभ मिळणार आहे.

सदर आधार प्रमाणीकरण करत असताना आपले सरकार केंद्रावर शेतकऱ्यांना प्रमाणीकरणासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येवू नये, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी आपले सरकार केंद्रांना दिलेल्या आहेत, याची सर्व पात्र शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन श्री. जगदाळे यांनी केले आहे.

## वनामकृवितील चार वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांचा विद्यार्थी-प्राध्यापकांशी प्रेरणादायी संवाद

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:**-वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी कुलगुरू म्हणून यशस्वी चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्याच्या पार्श्वभूमीवर कृषि व संलग्न महाविद्यालयांतील पदवी (UG), पदव्युत्तर (PG) व पीएच. डी. विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांशी संवाद साधला. विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन, विस्तार शिक्षण, विद्यार्थी कल्याण, संस्थात्मक विकास तसेच भविष्यातील वाटचालीसंदर्भात विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी कृषि महाविद्यालयाच्या सभागृहात या संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या संवाद कार्यक्रमात विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी, राष्ट्रीय अधिस्वीकृती (Accreditation) आणि मानांकन (रँकिंग) अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, विद्यार्थी व शिक्षकांच्या सूचना तसेच परस्पर हिताच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमात सर्व संचालक, अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्रभारी अधिकारी, विद्यार्थी प्रतिनिधी तसेच प्राध्यापकांनी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांचा यथोचित सत्कार केला.

यावेळी मार्गदर्शन करताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि म्हणाले की, दिनांक २५ जुलै २०२२ रोजी जेव्हा त्यांनी परभणीत पहिले पाऊल ठेवले, तेव्हा परभणीशी त्यांचे कोणतेही नाते नव्हते आणि या परिसराविषयी फारशी माहितीही नव्हती. मात्र साधेपणा, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर विद्यापीठ व परभणीतील जनतेशी एकरूप होण्यासाठी फारसा वेळ लागला नाही. आपले व्यक्तिमत्त्व सामाजिक असल्यामुळे समाजातील विविध घटकांशी सहज संवाद साधता आला. यामध्ये परभणीतील लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी, विद्यार्थी तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांचे मोठे सहकार्य लाभल्याचे त्यांनी नमूद केले.

परभणीच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा उल्लेख करताना त्यांनी "जगात जर्मनी आणि भारतात परभणी"



असे अभिमानाने नमूद केले. परभणीची ओळख राष्ट्रीय स्तरावर अधिक दृढ व्हावी, यासाठी केंद्रीय मंत्री, राष्ट्रीय पातळीवरील नामवंत शास्त्रज्ञ तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी यांना विद्यापीठात निमंत्रित करण्यात आले. या मान्यवरांनी परभणीबाबत अत्यंत सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्याचे त्यांनी सांगितले.

नेतृत्वाबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, नेतृत्व करताना अहंकार बाळगू नये किंवा पदाचा गर्व करू नये. पद मिळाले म्हणजे आपण सर्वश्रेष्ठ किंवा सर्वज्ञानी झालो, असा समज करून घेऊ नये. पद ही समाजसेवा करण्याची एक संधी आहे, अशी भावना ठेवून सर्वांशी चर्चा करूनच निर्णय घ्यावेत. तसेच कोणत्याही प्रकारच्या दबावाला बळी न पडता प्रामाणिकपणे व मेहनतीने कार्य करावे. "झिरो बार्गेनिंग पॉईंट" या तत्त्वाचे महत्त्व सांगताना त्यांनी "मला काम करू द्या" हा आपला कार्यमंत्र असल्याचे नमूद केले. विद्यापीठात कार्यरत असताना एकदाही कोणत्याही प्रकारचा दबाव जाणवला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रत्येकाने आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून कोणत्याही आठवणीशिवाय काम करण्याची वृत्ती विकसित करावी, स्वतःच्या कार्यावर विश्वास ठेवावा आणि चांगली प्रतिमा निर्माण करण्यासाठी सातत्यपूर्ण तपश्चर्या आवश्यक असते, असेही त्यांनी सांगितले. विद्यापीठात केवळ ३२ टक्के मनुष्यबळावर अनेक उल्लेखनीय यश संपादन करता आले, ते सर्वांच्या सामूहिक इच्छाशक्ती, समर्पण आणि परिश्रमामुळेच शक्य झाले असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

आपल्याला मिळालेल्या सहकार्याबद्दल त्यांनी परभणी ही आपली कर्मभूमी असल्याचे सांगत येथील लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी, जनसमुदाय, शेतकरी, विद्यार्थी तसेच विद्यापीठ परिवाराचे मनःपूर्वक आभार मानले.

सन २०२२ पूर्वीच्या कार्यापेक्षा मागील चार वर्षांत केलेल्या कार्यातून दहापट अधिक समाधान मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील चार वर्षांसाठीही सर्वांना सोबत घेऊन नियोजनबद्ध कार्य करण्यात येईल, जेणेकरून भविष्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही कार्य करणे अधिक सुलभ होईल, असे त्यांनी सांगितले. कठोर परिश्रम, वेळेचे नियोजन आणि समर्पण यांमुळे विद्यापीठाच्या अडचणी कमी झाल्या असून प्रत्येकाने "हे माझे विद्यापीठ आहे" ही भावना जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रीय स्तरावरील संशोधन प्रकल्पांसाठी परभणी कृषि विद्यापीठाला प्राधान्य दिले जात असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी सांगितले की, माननीय कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठात संघभावना व कार्यसंस्कृती अधिक बळकट झाली. त्यातून भारतीय कृषि अनुसंधान परिषदेकडून (ICAR-NAEAB) 'अ' दर्जाची अधिस्वीकृती मिळाली. तसेच NAHEP प्रकल्पांतर्गत ५१ विद्यार्थ्यां व २४ अधिकारीचे परदेशी प्रशिक्षण, सुमारे रु. १२५ कोटींचे संशोधन प्रकल्प, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, स्वयं (SWAYAM) पोर्टलवरील उल्लेखनीय कार्य, IIRF रँकिंगमध्ये महाराष्ट्रात प्रथम क्रमांक तसेच विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वित संशोधन केंद्रांपैकी १० केंद्रांनी देशात प्रथम क्रमांक मिळविल्याचा उल्लेख त्यांनी केला. मागील चार वर्षांत संशोधन, शिक्षण आणि विस्तार शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून आला. याबरोबरच माननीय कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली कृषि महाविद्यालय, गोळेगाव येथे कार्य करत असताना प्रयोगशाळेतील साहित्यांचे आधुनिकीकरण, कायमस्वरूपी संग्रहालयाची उभारणी, क्रीडांगणाचा विकास, सौर ऊर्जा प्रकल्पाची स्थापना तसेच विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी नवीन बसची खरेदी करण्यात आली. सौर ऊर्जा प्रकल्पामुळे वीज बिलात लक्षणीय बचत झाली असून या सर्व सुविधांचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जेआरएफ (JRF) परीक्षेत यश मिळविण्यास तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळविण्यास मोलाची मदत झाल्याचे त्यांनी सांगितले.

विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे यांनी सांगितले की, माननीय कुलगुरूंच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने मागील चार वर्षांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. सुरुवातीला कमी मनुष्यबळ व अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे अनेक शंका उपस्थित होत होत्या; मात्र कुलगुरूंनी अल्पावधीतच परिस्थितीत आमूलाग्र बदल घडवून आणला. बदनापूर येथील सौरऊर्जा प्रकल्प, विविध पायाभूत सुविधा तसेच शासनाकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी त्यांनी केलेले मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## आईकू झेड11 लाइट 5जी लॉन्च

**नवी दिल्ली :** उच्च-कार्यक्षमतेचा स्मार्टफोन ब्रँड आईकू ने आज आपला आईकू झेड11 लाइट 5जी लॉन्च केला. याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, हा स्मार्टफोन विद्यार्थ्यांचे कॅम्पस जीवन, ज्यात वर्ग, ग्रंथालय, वसतिगृह आणि प्रवासातील वापराचा समावेश आहे, हे लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आला आहे. आईकू झेड11 लाइट 5जी मध्ये सेगमेंटमधील सर्वोत्तम तेजस्वी डिस्प्ले, उपयुक्त AI उत्पादकता साधने, सुरळीत कामगिरी, उत्कृष्ट बॅटरी लाईफ आणि उत्तम टिकाऊपणा मिळतो. लेक्चर्सना उपस्थित राहण्यापासून आणि असाइनमेंट्स पूर्ण करण्यापासून ते रात्री उशिरापर्यंत अभ्यास करणे, कंटेंट पाहणे आणि मित्रांशी संपर्कात राहण्यापर्यंत, हा स्मार्टफोन विद्यार्थ्यांच्या सर्व दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केला आहे.मीडियाटेक डायमेन्सिटी 6300 प्रोसेसरद्वारे समर्थित, हा स्मार्टफोन मल्टीटास्किंग, मनोरंजन आणि दैनंदिन वापरासाठी एक सुरळीत आणि वेगवान अनुभव देतो. यात एआई क्रिएशन, एआई कॅप्शन्स आणि एआई ट्रान्सक्रिप्ट असिस्ट यांसारखी स्मार्ट एआई वैशिष्ट्ये देखील आहेत.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट यांच्यात सामंजस्य करार

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर ने आज वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट सोबत सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत "टोयोटा वसुंधरा" नावाचा सर्वसमावेशक जलसंधारण व जलव्यवस्थापन कार्यक्रम पायठण आणि छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील नऊ गावांमध्ये राबवला जाणार आहे. हा उपक्रम 6,167 हेक्टर क्षेत्र व्यापणार असून त्यातील 20% क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पामुळे 2,398 घरांतील 11,268 लोकांना थेट लाभ होणार आहे. औपचारिक एमओयू स्वाक्षरी समारंभ छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी श्री. विनय गौडा जी.सी. यांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमाला टोयोटा किर्लोस्कर मोटर आणि वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टचे वरिष्ठ प्रतिनिधी देखील उपस्थित होते.

## 317 कोटींचा करपश्चात नफा

मुंबई - उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाहीत ₹317 कोटींचा करपश्चात नफा नोंदवला. बँकेच्या ठेवी 24.6% वाढून ₹48,129 कोटी, तर कर्जपुस्तक 28.9% वाढून ₹42,903 कोटी झाले. एनआयआय ₹1,186 कोटी आणि एनआयएम 8.5% राहिले. बँकेची मालमत्ता गुणवत्ता सुधारत जीएनपीए 2.17% आणि एनएनपीए 0.34% वर आले. मजबूत आर्थिक कामगिरीच्या पार्श्वभूमीवर बँकेने आर्थिक वर्ष 2027 साठी आरओए गायडन्स 1.8% वरून 2.0% पर्यंत वाढवला असून, 25% मालमत्ता वाढीचे उद्दिष्ट कायम ठेवले आहे.

## क्रॉस जीन्सचे स्टोअर सुरु

**मुंबई :** महिलांच्या फॅशन क्षेत्रातील आघाडीचा ब्रँड क्रॉस जीन्सने कोल्हापुरात आपले पहिले स्टोअर सुरू केले असून, देशभरातील स्टोअर्सची संख्या 34 झाली आहे. 527 चौरस मीटरच्या या हाय-स्ट्रीट स्टोअरमध्ये सुपर वाइड लेग, स्ट्रेट फिट, वाइड लेग जीन्ससह स्प्रिंग-समर 2026 कलेक्शन, लिनन कलेक्शन आणि महिलांसाठी बेबी टीजची विस्तृत श्रेणी उपलब्ध आहे. उद्घाटनानिमित्त ग्राहकांना 3 किंवा अधिक उत्पादने खरेदी केल्यास 50% सवलतीची विशेष ऑफर देण्यात आली आहे.

## विवोने टी5ई लाँच केला

**नवी दिल्ली :** विवो इंडियाने आज विवो टी5ई लाँच करण्याची घोषणा केली. हा स्मार्टफोन नव्या पिढीच्या वापरकर्त्यांना विश्वसनीय कामगिरी, दीर्घ बॅटरी लाईफ, रोजच्या वापरासाठी टिकाऊपणा आणि एक आकर्षक मनोरंजन अनुभव देण्यासाठी डिझाइन केला आहे. वेगवान जीवनशैली जगणाऱ्या विद्यार्थी आणि तरुण व्यावसायिकांना लक्षात घेऊन डिझाइन केलेल्या विवो टी5ई मध्ये दीर्घकाळ टिकणारी 5500एमएएच बॅटरी, ओरिजिन ओएस 6 आणि अनेक उपयुक्त वैशिष्ट्ये आहेत, जी वापरकर्त्यांना दिवसभर उत्पादक, मनोरंजित आणि कनेक्टेड राहण्यास मदत करतात. उपयुक्त वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेल्या विवो टी5ई मध्ये एक आकर्षक आणि स्टायलिश डिझाइन देखील आहे, जे दैनंदिन वापरासाठी एक विश्वासार्ह, सहज आणि अखंड स्मार्टफोन अनुभव देते. वीवो टी5ई चा 4जीबी + 64 जीबी व्हेरिएंट ₹13,999 (सर्व करांसहित, बँक ऑफर्स वगळून) मध्ये उपलब्ध आहे.

## अत्याधुनिक कीड व्यवस्थापन

छत्रपती संभाजीनगर – बायरने आज 'ट्रान्स' या नावीन्यपूर्ण कीटकनाशकाची बाजारातील प्रवेशाची घोषणा केली. हे कीटकनाशक कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मावा, तुडतुडे आणि पांढरी माशी अशा रस शोषणाऱ्या कीट समूहांचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यास उपयुक्त ठरेल. एकाच उत्पादा मध्ये दोन प्रभावी कार्यपद्धती एकत्र करून 'ट्रान्स' व्यापक नियंत्रण देते, ज्यामुळे पिकांचे आरोग्य सुधारते आणि पिकाची उत्पादकता व शेतकऱ्यांचा नफा वाढतो. हे उत्पादन जुलै २०२६ पासून महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, तामिळनाडू, राजस्थान, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, पंजाब आणि हरियाणा अशा प्रमुख कापूस उत्पादक राज्यांमध्ये उपलब्ध होईल.

## भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी अजय पाटील यांची निवड ; सत्कार सोहळा संपन्न



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगांव,दि.२८ जुलै

भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी अजय योगेश पाटील यांची निवड निवड झाल्याबद्दल माजी सरपंच वसंत बनकर,जिल्हा चिटणीस सुनील गव्हांडे यांनी सत्कार केला. तसेच अजय पाटील यांची भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी,भाजप नेते सुरेश बनकर, ज्ञानेश्वर मोटे,जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,माहिन मुलतानी,सोयगाव पंचायत समिती सभापती उत्तम चव्हाण, तालुकाध्यक्ष संजय पाटील,माजी नगराध्यक्ष कैलास काळे, जयप्रकाश चव्हाण,शिवाजी बुढाळ,गणेश लोखंडे,सोयगाव पंचायत समिती सदस्य राहुल राठोड,बद्री राठोड,गुलाबराव कोलते,सोयगाव शहराध्यक्ष मंगेश सोहणी,राजेंद्र जावळे,माजी उपनगराध्यक्ष योगेश पाटील,प्रमोद पाटील, मयूर मनगटे,सुनील ठोंबरे,संजय तायडे,संजीवन सोनवणे, अनीस तडवी,राहुल परदेशी,बाळूशेट झंवर,संजय आगे, संजय चौधरी,विशाल गिरी,सिताराम पाटील,शांताराम खराटे,संजय मंडवे,दिपक पाटील,दिलीप पाटील,समाधान बावस्कर,दिलीप चौधरी,संजय मोरे,मोतीलाल वाघ आदींसह मित्र परिवार यांनी अभिनंदन केले.

### अनेक सुविधांचा अभाव; कवळ्या मनाच्या बालकावर डिजिटल ज्ञानाचे धडे कसे शिकवणार

# जिंतूर तालुक्यातील २४६ अंगणवाड्यामध्ये विद्युत पुरवठात नसल्याने डिजिटल तंत्रज्ञानाला हरताळ

### विद्युत पुरवठा नाही, पाणीपुरवठा नाही, अनेक इमारतींना गळती, अनेक इमारती धोकादायक







**जिंतूर प्रतिनिधी / सचिन रायपत्रीवार :** तालुक्यातील महिला बालकल्याण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या अंगणवाड्याची देखभाल, दुरुस्ती, विद्यार्थ्यांना पोषण आहार, महिलांचे आरोग्य ,विद्यार्थ्यांचे लसीकरण, बालकांचा सर्वांगीण विकास, डिजिटल तंत्रज्ञानाची ओळख, विविध खेळाचे साहित्य मनोरंजन इत्यादी सुविधा अंगणवाडी मार्फत दिल्या जातात .परंतु धक्कादायक बाब अशी की जिंतूर तालुक्यातील एकूण 316 असून 246 अंगणवाड्यांमध्ये विद्युत पुरवठा केला नसल्याने डिजिटल तंत्रज्ञानाला या अंगणवाड्यामध्ये हरताळ फसला आहे. नवीन शैक्षणिक वर्ष चालू झाले असून केवळ 6 आठवडे झाले आहेत. परंतु जून,जूलै मध्ये पडलेल्या पावसामुळे जिंतूर तालुक्यातील एकूण 77 अंगणवाड्यांना छेत गळती चालू झाली आहे. अशी माहिती महिला व बालकल्याण विभाग जिंतूरच्या वतीने वरिष्ठ कार्यालयांना कळविण्यात आली आहे. परंतु याकडे अद्यापही दुर्लक्ष केले असल्याने सदरील कवळ्या बालकांच्या मनावर याचा दुष्परिणाम होत आहे.

जिंतूर तालुक्यातील एकूण अंगणवाडीत अनेक समस्यांच्या विळाख्यात आहेत.

छताचे पाणी पडत असल्याने अनेक आंगणवाड्यामधील साहित्याचे नुकसान व खराब झाले आहेत . पोषण आहार, डिजिटल साहित्य खेळण्याचे साहित्य ,विद्यार्थ्यांना बसण्यासाठी अडचणी निर्माण झाले आहेत. ज्यांनी काम घेतली त्यांनी काम व्यवस्थित न केल्याने बोगस काम केल्यामुळेच हा प्रकार सर्व समोर आला आहे. परंतु अंगणवाड्यांची दुरावस्था झाली आहे. राजकीय वरदहस्त असल्याने गुत्तेदाराने मनमानी पद्धतीने व शासकीय अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने हा सर्व प्रकार दिसून येत आहे. अंगणवाड्यामध्ये विद्युत पुरवठा देण्यासाठी कोणाच्या नावाने मीटर घेण्यात यावी .सदरील मीटरचे डिपॉझिट कोणी भरावे. तसेच मासिक येणारे बिल कोणी भरावी याची लेखी स्वरूपात माहिती नसल्याने हा सर्व सावळा गोंधळ दिसून येत आहे त्यामुळेच डिजिटल तंत्रज्ञानाला जिंतूर तालुक्यातील अंगणवाड्यामध्ये हरताळ फासली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**जिंतूर तालुक्यातील एकूण अंगणवाडी संख्या 316**
**1 विभाग मध्ये अंगणवाडी संख्या 142**
**२ विभाग मध्ये अंगणवाडी संख्या 174**
**1 विभागात विद्यार्थी संख्या आदाजे 6600**
**२ विभागात विद्यार्थी संख्या अंदाजे 7500**

**छेताला गळती लागलेल्या अंगणवाडी :** जोगी तांडा, डिग्रस १,डिग्रस २, मांडवा ,घेवडा,अंबरवाडी१,अंबरवाडी३, किन्ही, अंगलगाव तांडा ,भोसी १,भोसी २, पिंपळगाव काजळे, पिंपळगाव तांडा१, पिंपळगाव तांडा२, कुऱ्हाडी,मुरूमखेडा, यासह एकूण 77 अंगणवाड्यांची हीच अवस्था आहे.

**अंगणवाडी धोकादायक इमारती :** केहाळ २,मांडवा, अंगलगाव, असोला ,भागूनाईक तांडा ,जांब तांडा, पाचलेगाव२, सोनापूर २

**अंगणवाडीत विद्युत पुरवठा जोडणी नाहीत. :** जिंतूर तालुक्यातील एकूण 316 अंगणवाडी यापैकी 246 अंगणवाडीमध्ये विद्युत पुरवठा जोडणी अद्यापही केलेली नाही. त्यामुळे बालकांना डिजिटल माहिती पुरविण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

**आलेले साहित्य धुळखात पडून आहे. :** शासनाच्या वतीने अनेक अंगणवाड्यांना लाखो रुपयांचे साहित्य देऊन सदरील अंगणवाड्यांमध्ये विद्युत पुरवठा नसल्याने साहित्य धुळखात पडून आहे .याकडे मात्र प्रशासनाची दुर्लक्ष असून बालकांना तंत्रज्ञानापासून वंचित ठेवले जात आहे.

**स्वच्छालय यांचा अभाव :** अनेक अंगणवाड्यामध्ये स्वच्छालय मात्र नावालाच असून बालकांना त्याचा उपयोग होत नाही. पाणीपुरवठा नळ कलेक्शन नसल्याने सदरील स्वच्छालय बंद अवस्थेत आहेत. अनेक अंगणवाड्यामध्ये बालकांना स्वच्छालय उघड्यावर पाठविले जात आहेत.

**अंगणवाड्यात पाणीपुरवठा नाही:** जिंतूर तालुक्यातील अनेक अंगणवाड्यामध्ये नळ पुरवठा नाही,बोर, हात पंप नाही व पाणीपुरवठ्याची कुठली साधन नसल्याने अंगणवाडीत परसबाग फुलविणे दुरावस्त झाले.

**डिजिटलायझेशनचे मुख्य फायदे :** डिजिटल अंगणवाडी

काही आधुनिक अंगणवाड्यांमध्ये लहान मुलांच्या पूर्व-प्राथमिक शिक्षणासाठी (Pre-school education) स्मार्ट टीव्ही, एलईडी स्क्रीन्स आणि ऑडिओ-व्हिज्युअल (Audio-Visual) तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे, जेणेकरून मुले आवडीने शिकू शकतील.

## 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' अभियान: छत्रपती संभाजीनगर येथे 30 जुलै रोजी जिल्हास्तरीय सृजनशील स्पर्धा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली 'मेरा युवा भारत' (MY Bharat) छत्रपती संभाजीनगरच्या वतीने 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' या राष्ट्रीय अभियानांतर्गत जिल्हास्तरीय सृजनशील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता देवगिरी महाविद्यालयात पार पडणार असून, जिल्ह्यातील अधिकाधिक युवक-युवतींनी यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. भारताला व्यसनमुक्त आणि विकसित राष्ट्र बनविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने हे राष्ट्रीय अभियान हाती घेतले आहे. या उपक्रमाद्वारे युवकांमध्ये जनजागृती निर्माण करणे, सामाजिक उत्तरदायित्वाची भावना वाढीस लावणे आणि कला-साहित्याच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचविणे हा मुख्य हेतू आहे. या स्पर्धेमध्ये व्यसनमुक्ती, निरोगी जीवनशैली, सामाजिक जबाबदारी आणि विकसित भारत निर्मितीत युवकांची भूमिका या विषयांवर सहभाग नोंदवता येईल. १५ ते २९ वयोगटातील सर्व युवक-युवती वैयक्तिक किंवा गट स्वरूपात या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. युवकांना आपल्या सृजनशीलतेद्वारे विचार मांडण्यासाठी चित्रकला, घोषवाक्य लेखन, नृत्य, संगीत, पथनाट्य, भाषण, रील निर्मिती तसेच मुक्तछंद काव्य सादरीकरण (स्लॅम पोएट्री) या विविध कलाप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, युवक मंडळे आणि इच्छुक युवक-युवतींनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी मेघा सनवाल यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. सहभागासाठी ८६९८१६४८२२ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा mybharatchhsambhajinagar@gmail.com या ईमेल आयडीवर संपर्क साधता येईल.

## वयाच्या 85व्या वर्षी घाटीत जटिल कानाची शस्त्रक्रिया यशस्वी

### अनेक रुग्णालयांनी शस्त्रक्रियेस नकार; तज्ज्ञ डॉक्टरांच्या प्रयत्नांतून ऐकण्याची क्षमता सुधारली

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** वय हे उपचारासाठी अडथळा नसून योग्य वैद्यकीय निर्णय, आधुनिक तंत्रज्ञान आणि अनुभवी डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाल्यास वृद्ध रुग्णांनाही नवजीवन मिळू शकते, याची प्रचिती घाटी रुग्णालयाच्या कान-नाक-घसा (ईएनटी) विभागाने पुन्हा एकदा दिली आहे. वयाच्या ८५व्या वर्षी एका ज्येष्ठ रुग्णावर करण्यात आलेली जटिल कानाची शस्त्रक्रिया यशस्वी ठरली असून, शस्त्रक्रियेनंतर त्यांच्या ऐकण्याच्या क्षमतेत लक्षणीय सुधारणा झाली आहे.



सदर रुग्णाला २०१८ पासून दोन्ही कानांचा दीर्घकालीन पूयुक्त संसर्ग होता. सतत कानातून पू येणे, ऐकण्याची क्षमता कमी होणे आणि वारंवार होणाऱ्या त्रासामुळे त्यांचे दैनंदिन जीवन अत्यंत कठीण झाले होते. प्रगत वयामुळे अनेक ठिकाणी शस्त्रक्रिया करण्यास नकार देण्यात आला. त्यामुळे कुटुंबीयांनी परदेशात उपचाराचा विचारही केला होता. मात्र अखेर त्यांनी घाटी रुग्णालयावर विश्वास ठेवला आणि तो सार्थ ठरला. या संपूर्ण उपचार प्रक्रियेस घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचे मार्गदर्शन लाभले. ईएनटी विभागप्रमुख डॉ. सुनील देशमुख यांच्या नेतृत्वाखाली डॉ. सोनाली जटाळे, डॉ. प्रतीक्षा पाटील, डॉ. प्रतीक्षा येरेंडे, डॉ. उत्कर्ष, डॉ. ऋतुजा आणि डॉ. वत्सल यांनी समन्वयाने ही जटिल शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. तसेच भुल विभागप्रमुख डॉ. गायत्री तडवळकर व त्यांच्या सहकाऱ्यांनीही मोलाचे सहकार्य केले. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या कानातील दीर्घकालीन संसर्ग पूर्णपणे नियंत्रणात आला असून, त्यांच्या ऐकण्याच्या क्षमतेतही लक्षणीय सुधारणा झाली आहे. ऑडिओग्राम तपासणीतही ही सुधारणा स्पष्टपणे दिसून आली.

उपचारानंतर रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांनी घाटी रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, तांत्रिक कर्मचारी आणि सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. "आम्ही परदेशात उपचाराचा विचार करत होतो; मात्र घाटी रुग्णालयाने आमचा विश्वास सार्थ ठरवला. आमच्या वडिलांना पुन्हा ऐकण्याचा आनंद आणि त्रासमुक्त जीवन मिळाले," अशी भावना रुग्णाच्या मुलाने व्यक्त केली.

## रोटरी ईस्ट क्लब जळगाव यांच्या कडून सोयगाव येथील विद्यार्थ्यांना छत्रींचे वाटप



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२८ जुलै :** रोटरी ईस्ट क्लब जळगावचे अध्यक्ष डॉ.मनोज चौधरी व सचिव पुजा अग्रवाल तसेच सोयगाव येथील समाजसेवक तसेच नवनियुक्त रोटरी ईस्ट क्लब जळगाव चे सदस्य डिगांबर वाघ यांच्या अनमोल सहकार्याने पावसाळ्यात पावसापासून विद्यार्थ्यांचे संरक्षण होण्यासाठी छत्र्यांचे वाटप केंद्रप्रमुख फिरोज तडवी,समाजसेवक तसेच रोटरी क्लब चे नवनियुक्त सदस्य डिगंबर वाघ,शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी ईस्ट क्लब जळगाव सदस्य पदी निवड झाल्या बद्दल समाजसेवक दिगंबर वाघ यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी शाळेतील सुरेखा चौधरी,रामचंद्र महाकाळ,मंगला बोरसे,सविता पाटील,गणेश बाविस्कर, प्रतिभा कोळी,शुभम देसले,तानाजी चव्हाण,पुनम लाड हे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांनी रोटरी ईस्टचे क्लब आभार मानून भविष्यातही आमच्या विद्यार्थ्यासाठी असेच सहकार्य असावे अशी ईच्छा व्यक्त केली.

## जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुका क्रीडा स्पर्धांचे नियोजन

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी



**सोयगाव,दि.२८ जुलै :** तालुका क्रीडा स्पर्धा २०२६-२७ च्या यशस्वी आयोजनासाठी नियोजन बैठक जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. या बैठकीस संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील प्राचार्य डॉ.शिरीष पवार व उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

बैठकीत तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक, आयोजनाची रूपरेषा,स्पर्धा सुरळीत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक नियोजन तसेच विविध शाळा व महाविद्यालयांच्या जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी तालुका क्रीडा संयोजक तथा क्रीडा विभाग प्रमुख डॉ.निलेश गाडेकर यांनी सन २०२६-२७ मधील तालुका क्रीडा स्पर्धांचे सविस्तर नियोजन उपस्थितांसमोर मांडले. त्यांनी स्पर्धा पारदर्शक,दर्जेदार व खेळाडूकेंद्रित पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या.नुकतीच जिल्हा क्रीडा अधिकारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल मुकुंद वाडकर यांचा संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.तसेच क्रीडा अधिकारी यादव यांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याचप्रसंगी तालुक्यातील सर्व क्रीडा शिक्षकांच्या वतीने गोबरा राठोड यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी मुकुंद वाडकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करून शुभेच्छा दिल्या. बैठकीस तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयांचे क्रीडा शिक्षक,प्रतिनिधी व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी तालुक्यातील क्रीडा चळवळ अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन केले.

## आषाढी एकादशीनिमित्त रंगला "गजर विठ्ठलाचा भक्तिमय संगीत कार्यक्रम

**परतुर :** देवर्षी संगीत विद्यालय आयोजित आषाढी एकादशीच्या पावन पर्वा निमित्त " गजर विठ्ठलाचा" प्रा. रामेश्वरजी नरवडे निर्मित भव्य दिव्य भक्तिमय सोहळा, वारकरी संप्रदायाच्या भक्तिमय वातावरणात अत्यंत उत्साहात आणि भक्तीरसात संपन्न झाला. या सोहळ्यात गुंतलेल्या भक्तिसागराच्या भक्ती गीतांनी उपस्थितीत वारकरी भक्तगण, रसिकांनी मंत्रमुग्ध होत भाव रसाचा आनंद घेतला. यावेळी अनेक मान्यवर विविध क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्व तसेच वारकरी संप्रदायातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.





उद्घाटक भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल भैया लोणीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कपिल भैया आकात, नितीन जेथलिया, शत्रुघन कणसे, शाम तेलगड, रमेश आढाव ,डॉ. भगवानराव दिरंगे, नगराध्यक्ष प्रतिनिधी आकाश राक्षे, उपनगराध्यक्ष विजय राखे, विनायकराव काळे, सावता काळे, ऋषी कराळे, लॉयन्स क्लबचे मनोहर खालापूरे,नामदेव धुमाळ, बजरंग वरकड यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरुवात यश काकडे यांच्या "येई व विठ्ठले" या भक्ती गीताने झाली. या भक्ती गीतामध्ये सर्वश्रोते मंत्रमुग्ध झाले. तसेच वातावरण भक्तिमय झाले. शिला आव्हाड, यांनी "भक्त पुंडलिकासाठी" भक्ती गीत गायले. रोहित चिंचोळकर यांनी "हरी म्हणा तुम्ही" हा अभंग सादर केला.

सौ.शारदा राजबिंडे यांनी तसेच निवृत्ती बिडवे यांनी अभंगाचे सुरेख सादरीकरण केले. डॉ. सुराशे, विजय गिरी यांनी गायलेल्या भक्ती गीतांना प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला. सौ.मनीषा निकाळजे, जगन्नाथ शिंदे, बालकलाकार शिवदीप शिंदे, यांनी भक्ती गीते गाऊन संपूर्ण परिसर भक्तीमय केला. नित्यश्री यादव, सुरभी नरवडे, आणि अमृता नरवडे, यांनी बहारदार नृत्य करून कार्यक्रमात रंगत आणली. शेवटी प्रा.रामेश्वर नरवडे यांच्या "कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी" या अभंगांनी उपस्थितांना ठेका धरायला लावला.

या पवित्र सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. ज्ञानोबा काकडे सर ,रामेश्वर जाधव, विष्णू पावले, प्रा.श्याम जवळेकर, शिवहरी डोळे,अर्जुन यादव,यश काकडे, भारत हिवाळे,यांनी प्रयत्न केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानकडून वारकरी भाविकांसाठी फराळाचे वाटप



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आऊसाहेब सेवा प्रतिष्ठानतर्फे वारकरी भाविकांसाठी सेवाभावी फराळ वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. प्रतिष्ठानने सलग सहाव्या वर्षी हा उपक्रम राबवत सामाजिक बांधिलकीची परंपरा कायम राखली.

या उपक्रमांतर्गत सेव्हन हिल, आकाशवाणी चौक आणि मोंढा नाका परिसरात पंढरपूरच्या दिशेने पायी वारी करणाऱ्या हजारो वारकरी भाविकांना साबुदाणा खिचडी, केळी तसेच पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे मोफत वाटप करण्यात आले. दिवसभर स्वयंसेवकांनी उत्साहाने सेवा बजावत भाविकांची आदरातिथ्याने सेवा केली.

"वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा" या भावनेतून आऊसाहेब सेवा प्रतिष्ठान गेल्या सहा वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवत आहे. फराळाचा लाभ घेतलेल्या वारकरी भाविकांनी प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे कौतुक करत समाधान व्यक्त केले.

आऊसाहेब सेवा प्रतिष्ठान विविध सामाजिक आणि सेवाभावी उपक्रमांद्वारे समाजाशी आपली बांधिलकी जपत असून, भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात समाजोपयोगी उपक्रम राबवून समाजसेवेचा वसा कायम ठेवण्याचा निर्धार संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

## नीटमध्ये यश; प्राजक्ता मांदळेचा राज्यमंत्र्यांकडून सत्कार



**जिंतूर :** नीट-2026 परीक्षेत 720 पैकी 605 गुण मिळवत ऑल इंडिया रँक 8505 प्राप्त करणाऱ्या प्राजक्ता संतोष मांदळे हिचा महाराष्ट्राच्या राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर-साकोरे यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी प्राजक्ताचे वडील संतोष मांदळे, आई सुषमा मांदळे, काका संदीप मांदळे, काकू स्वप्नीता मांदळे, बाळू बुरकुले व राणी बुरकुले उपस्थित होते.

## नवतरुण मित्र मंडळ पाणजेच्या वतीने वृक्षारोपण व स्वच्छता अभियान संपन्न




हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** नवतरुण मित्र मंडळ, पाणजे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वर्षा सहलीचे औचित्य साधून वृक्षारोपण तसेच शिवमंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत मंडळाच्या सदस्यांनी विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच शिवमंदिर परिसराची स्वच्छता करून परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा आदर्श निर्माण केला आहे.यावेळी अक्कादेवी मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात आर. झुंजारवाला ट्रस्टचे डॉक्टर व सहकारी, ग्रामपंचायतीचे सरपंच लकपती पाटील, माजी उपसरपंच अविनाश पाटील, मंडळाचे अध्यक्ष दर्शन पाटील, कार्याध्यक्ष हेमंत पाटील, चंद्रकांत पाटील, विश्वनाथ पाटील, सदस्य अरुण पाटील, जितेंद्र पाटील, ॲड. विक्रम पाटील, मिलिंद पाटील, मंजीत पाटील, दीपेश पाटील, नंदलाल पाटील, सुशांत पाटील, सुनील पाटील, सचिन भोईर, महेंद्र पाटील, प्रकाश पाटील, लहुराज भोईर मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. या सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.४२ वर्षे परंपरा जोपसणारे नवतरुण मित्र मंडळाच्या या सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत असून, युवकांनी केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न राहता सामाजिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा, असा सकारात्मक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# आ.संजय केणेकर यांच्या संकल्पनेतून ड्रोनद्वारे 50 हजार सीड बॉल्सची आकाशातून पेरणी

## मराठवाड्यातील 5 लाख वृक्षलागवडीच्या महासंकल्पाला वेग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मोत्सवानिमित्त आयोजित 'देवेंद्रजी जन्मोत्सव – हरित महोत्सव' आणि 'हरित महाराष्ट्र सप्ताह' अंतर्गत ग्रीन ग्लोब फाउंडेशन व धर्मन वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बकापूर-पळशी येथे ड्रोनच्या साहाय्याने तब्बल ५० हजार सीड बॉल्सची आकाशातून पेरणी करण्यात आली. माजी आमदार तथा हरित महाराष्ट्र अभियानाचे मराठवाडा मुख्य समन्वयक संजय केणेकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाने पर्यावरण संवर्धनासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून एक वेगळा आदर्श निर्माण केला.

मराठवाड्यात ५ लाख वृक्षलागवडीच्या महासंकल्पाचा भाग असलेल्या या उपक्रमाद्वारे दुर्गम व मोकळ्या परिसरात मोठ्या प्रमाणावर सीड बॉल्सची पेरणी करण्यात आली. कमी वेळेत विस्तीर्ण क्षेत्र हरित करण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर प्रभावी ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे होते.

यावेळी पंचायत समिती सभापती कल्याण पाटील गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य अजिनाथ धामणे, पंचायत समिती सदस्य निर्मलाताई पळसकर, उपजिल्हाधिकारी राठोड, तहसीलदार बिडवे, नगरसेवक रामेश्वर भादवे, तुषार दरक, गटविकास अधिकारी साळुंखे, आत्माराम पळसकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाची चळवळ लोकसहभागातून अधिक व्यापक करण्याचे आवाहन केले. संजय केणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या 'संकल्प हरित महाराष्ट्राचा... सहभाग प्रत्येक जनमानसाचा!' या अभियानाला मराठवाडाभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, त्याचाच एक भाग म्हणून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

# स्व. आशाताई मुदकवी यांच्या स्मरणार्थ माई वृद्धाश्रमाला 25 खुर्च्यांची अनमोल भेट

## गुरुपौर्णिमेनिमित्त सेवाभावाचा आदर्श; निराधार माईंना मिळाला सन्मानाने बसण्याचा आधार




**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** "दान हे केवळ वस्तूंचे नसते, तर ते माणुसकीचे असते," याची प्रचिती गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिवशी माई वृद्धाश्रमात अनुभवायला मिळाली. समाजसेवा आणि मानवतेची जपणूक करणाऱ्या मुदकवी परिवाराने स्वर्गीय आशाताई मुदकवी यांच्या पवित्र स्मृतीप्रित्यर्थ माई वृद्धाश्रमातील अनाथ, निराधार व वंचित ज्येष्ठ माईंना बसण्यासाठी २५ मजबूत खुर्च्यांची अनमोल भेट देत सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले.

या सेवाकार्यात शारदा मुदकवी, मंजुषा अत्रे, ज्योत्स्ना फुलंब्रीकर आणि मैत्रेय मुदकवी यांनी पुढाकार घेतला. गुरुपौर्णिमेसारख्या पवित्र दिवशी दिलेली ही भेट वृद्धाश्रमातील ज्येष्ठ माईंसाठी केवळ खुर्च्यांची देणगी नसून, त्यांच्या सन्मानपूर्वक जीवनाचा आधार ठरली आहे.

माई वृद्धाश्रमात अनेक निराधार, अनाथ आणि वंचित माता प्रेम, माया आणि आधाराच्या शोधात वास्तव्यास आहेत. त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींचे सहकार्य मोलाचे ठरत असून मुदकवी परिवाराने केलेली ही मदत त्याच संवेदनशीलतेचे प्रतीक ठरली. यावेळी माई वृद्धाश्रमाच्या संचालिका मीराताई वाघमारे, ऋत्विक वाघमारे, गौरव वाघमारे तसेच वृद्धाश्रमातील ज्येष्ठ माईंनी मुदकवी परिवाराचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. "अशा सेवाभावी व्यक्तींमुळे समाजात माणुसकी आजही जिवंत असल्याची जाणीव होते," अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. आजच्या स्वार्थी युगात वृद्धांचा सन्मान, त्यांच्या गरजांची जाणीव आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी जपणारे असे उपक्रम समाजाला नवी दिशा देणारे आहेत. गुरुपौर्णिमेच्या दिवशी दिलेली ही देणगी केवळ वस्तुरूप मदत नसून, "सेवेतच ईश्वर आहे" या विचाराची प्रत्यक्ष अनुभूती देणारी ठरली.

समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने अशा सेवाकार्यात सहभागी होऊन निराधार वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलवावे, हाच या प्रेरणादायी उपक्रमाचा खरा संदेश आहे.

# पागोटे येथे विद्यार्थी गुणगौरव व सामाजिक उपक्रमांचा प्रेरणादायी सोहळा उत्साहात संपन्न

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**उरण / रायगड :** कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था व शिवसेना शाखा पागोटे यांच्या संयुक्त विद्यमाने पागोटे येथे विद्यार्थी गुणगौरव व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . सोमवार, दि. २७ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता श्री गणेश हनुमान मंदिर, पागोटे येथे हा कार्यक्रम मोठया उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमांतर्गत नवघर जिल्हा परिषद शाळांमधील आदर्श व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, तसेच उरण तालुक्यातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याचा हा उपक्रम सर्वांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे.

यासोबतच पागोटे गावातील निराधार व गरजू महिलांना वस्तू वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रमही यावेळी राबविण्यात आला. शिक्षण आणि सामाजिक सेवा यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमातून समाजातील गरजू घटकांना आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

कार्यक्रमाला विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. विशेषतः मनोहरशेठ भोईर माजी आमदार,गणेश शिंदे उरण माजी नगराध्यक्ष, अतुल ठाकूर नगरसेवक गटनेता, अमित ठाकूर नगरसेवक,प्रेरणाताई पाटील जिल्हा परिषद सदस्य, परेश ठाकूर उपसभापती, दीपक भोईर पंचायत समिती सदस्य, संतोष पवार उरण सामाजिक संस्था सेक्रेटरी, महादेव बंडा माजी उपसभापती, सुनील तांडेल राष्ट्रवादी काँग्रेस नवघर पंचायत समिती, सुजित काशिनाथ पाटील काँग्रेस अध्यक्ष पागोटे, महेंद्र पाटील शिवसेना शाखा प्रमुख पागोटे आदी मान्यवर उपस्थित होते तसेच कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेचे सर्व पदाधिकारी सदस्य यावेळी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार, वस्तू वाटप आणि अन्य सामाजिक उपक्रम पार पडला.या उपक्रमासाठी रायगड जिल्हा परिषद सदस्या प्रेरणा कुणाल पाटील तसेच पागोटे ग्रामपंचायतीचे सरपंच कुणाल अरुण पाटील यांच्यासह शिवसेना शाखा पागोटे व ग्रामस्थ मंडळ पागोटे यांचे सहकार्य लाभले आहे.विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्याला प्रोत्साहन देणे आणि गरजू महिलांना मदतीचा हात देणे, या दुहेरी उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा सामाजिक उपक्रम पागोटे परिसरातील सामाजिक बांधिलकीचे एक प्रेरणादायी उदाहरण ठरला आहे. कार्यक्रमाचे उत्तम आयोजन व नियोजन असल्यामुळे उपस्थित मान्यवर,नागरिकांनी व ग्रामस्थांनी कार्यक्रमाचे व आयोजकांचे कौतुक केले.

# बिडकीनमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न




**बिडकीन प्रतिनिधी :** पैठण तालुक्यातील मौजे लोहगाव येथे वरद हॉस्पिटल अँड आयसीयू, बिडकीन यांच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हे शिबिर वरद हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुरेश जंगले व डॉ. जागृती सुरेश जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. या शिबिरामध्ये अनेक गरजू नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणी करून मुलांना मोफत औषध वाटप करण्यात आले. तसेच आयुष्मान भारत कार्ड व वय वंदना कार्ड यांचेही मोफत वितरण करण्यात आले. या योजनांमुळे पात्र लाभार्थ्यांना शासनामार्फत आरोग्य विभागाच्या अंतर्गत ₹५ लाखांपर्यंतचा आरोग्य विमा लाभ मिळणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. शिबिरात वरद हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहन कोल्हे, हॉस्पिटलचे सीईओ अनिल गरड, अक्षय महाजन व शाखेर शेख यांनी रुग्णांना आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य केले.

याप्रसंगी माजी सरपंच दिलीप जगताप, सरपंच गणेश इथापे, ग्रामपंचायत अधिकारी सुहास पाटील, ग्रामपंचायतीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी तसेच महिला, पुरुष व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री अमृतेश्वर राम मंदिरात महाआरती



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखाली कुंभारवाडा, गुलमंडी येथील श्री अमृतेश्वर राम मंदिरात महाआरती करण्यात आली.

यावेळी श्रीरामाच्या चरणी महाआरती अर्पण करून रामरक्षा, मारुती स्तोत्र आणि हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करण्यात आले. राज्याच्या तसेच समाजाच्या सुख-समृद्धीसाठी आणि सर्वांच्या आरोग्य, शांतता व कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली.

या कार्यक्रमाला मंदिराचे पांडुरंग व्यवहारे, भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस प्रभाकर मते पाटील, उपजिल्हाप्रमुख विठ्ठल बदर, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, ज्ञानेश्वर डांगे, दिग्विजय शेरखाने, विधानसभा संघटक गोपाल कुलकर्णी, गिरीश चपळगावकर, वीरभद्र गादगे, नगरसेवक सचिन खैरे, व्यापारी आघाडीचे विजय जैस्वाल, विजय सूर्यवंशी, कुणाल पाठक, शिवकुमार देशमुख, माजी नगरसेवक मंगेश भाले, अविनाश हिवराळे, प्रांजल व्यवहारे, प्रसाद व्यवहारे, योगेश मिसाळ, सुरेश फसाटे, मंदाकिनी व्यवहारे, विजय जोशी गुरुजी तसेच महिला आघाडीच्या सुनीता आऊलवार, सुनीता देव, आशा दातार, नलिनी बाहेती, सुनीता सोनवणे, रेणुका जोशी, वंदना कुलकर्णी आणि युवती सेनेच्या कोमल पांढरे यांच्यासह शिवसैनिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एमजीएम विद्यापीठात गुरुवारी राष्ट्रीय प्राकृत भाषा परिषदेचे उद्घाटन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या भारतीय तथा विदेशी भाषा संस्था आणि केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार (दि. ३०) व शुक्रवार (दि. ३१ जुलै) रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय प्राकृत भाषा परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'लोकभाषा प्राकृत - भारतीय विचार-परंपरा आणि सांस्कृतिक वारशाचा ठेवा' या विषयावर होणाऱ्या या परिषदेत देशभरातील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि प्राकृत भाषा अभ्यासक सहभागी होणार आहेत.

परिषदेचा उद्घाटन सोहळा गुरुवार, ३० जुलै रोजी सकाळी १० वाजता एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. उद्घाटन समारंभाला केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. श्रीनिवास वरखेडी, श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाचे प्रो. डॉ. वीरसागर जैन, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रीय प्राकृत भाषेची समृद्ध परंपरा, भारतीय वैचारिक वारसा आणि सांस्कृतिक योगदान यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. परिषदेत विविध शैक्षणिक सत्रांचे आयोजन करण्यात आले असून संशोधन निबंधांचे सादरीकरण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, विचारमंथन आणि विषयावरील सखोल चर्चेद्वारे संशोधकांना परस्पर संवादाची संधी उपलब्ध होणार आहे. प्राकृत भाषेच्या अभ्यासाला चालना देत भारतीय ज्ञानपरंपरेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने ही राष्ट्रीय परिषद महत्त्वाची ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

## हर्सूल येथील घराच्या बांधकामावरील साहित्य चोरी करणारा चोरटा जेरबंद




हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** हर्सूल परिसरातील कैसर पार्क येथील सुरू असलेल्या बांधकामावरून २४ जुलै रोजी ३२,००० हजार रुपये किमतीचे इलेक्ट्रिक केबल वायरचे ६ बंडल आणि प्लॅस्टिक ड्रायव्हर्स मिक्सर ३ नग असे साहित्य कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेले होते. या प्रकरणी हर्सल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मिळालेल्या माहितीनुसार गुन्ह्याचा तपास करत असताना हर्सूल पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाला गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आणि तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपी निष्पन्न करण्यात आला होता. पथकाने हद्दीत शोध घेऊन संशयित आरोपी शेख अमान शेख मिनाज (वय २२ वर्ष, धंदा. मजुरी, रा. गल्ली नंबर ०१, कैसर पार्क, हर्सूल रोड येथून ताब्यात घेतले. त्यास गुन्ह्यात अटक करण्यात आली असून न्यायालयात ५ दिवसांचा पोलीस कोठडी देण्यात आली. चौकशीदरम्यान आरोपीने लपवून ठेवलेला ३२,००० रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

## एसबीआय लाईफ इन्शुरन्सची पीसीआय भागीदारी

**छत्रपती संभाजीनगर :** एसबीआय लाईफ इन्शुरन्स या भारतातील अत्यंत विश्वासू खासगी जीवन विमा कंपनीने आज पॅरालिम्पिक समिती ऑफ इंडियासोबतची (पीसीआय) आपली भागीदारी अधिक दृढ करत, २०२६ च्या पॅरा स्पोर्ट्स सीझन भारतीय पथकाचे 'प्रिन्सिपल पार्टनर' बनण्याची घोषणा केली. ग्लासगो येथे होणाऱ्या आगामी कॉमनवेल्थ पॅरा गेम्स २०२६ आणि आयची-नागोया, जपान येथे होणाऱ्या आशियाई पॅरा गेम्स २०२६ साठी जाणाऱ्या भारतीय पॅरालिम्पिक पथकासाठी कंपनी 'ऑफिशियल लाईफ इन्शुरन्स पार्टनर' म्हणून काम करेल. पॅरिस २०२४ पॅरालिम्पिक खेळांदरम्यान भारतातील पॅरा-खेळाडूंसोबत आपल्या यशस्वी सहयोगाचा विस्तार करत एसबीआय लाईफ जिद्द, पूर्वतयारी आणि उत्कृष्टतेच्या अशा कथांना सातत्याने प्रोत्साहन देत आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911